सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**वन विभाग**

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती कॅम्प, अमरावती - 444602**

**दुरध्वनी क्र.** (0721) 2662090/2662593/2662680, (वैयक्तिक) **फॅक्सक्र.**- 2663314

**ई-मेल** : aticcfa@gmail.com / ccftamravati@mahaforest.gov.in/ **हॅलो फॉरेस्ट (नि:शुल्क) 1926**

आदेश क्रमांक :- 240 अमरावती -२, दिनांक:- 21.2.2024

संदर्भ:-
१ उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा यांचे आदेश क्रमांक- १२८, दिनांक ०३.०८.२०२२.
२ या कार्यालयाचे पत्र क्रमाक कक्ष-८/ आस्था-टी-३/ निलंबन आढावा बैठक / १५६९/ २०२३-२४, दिनांक २४.०८.२०२३.
३ विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय,अमरावती यांचेकडील पत्र क्र.विआकाअ /अ.का./ म.शा.२ / निआसबै/कावि-१९/२०२४, दिनांक१८.०१.२०२४.

ज्याअर्थी श्री अश्विन शंकरराव महल्ले, हे वनपाल मेव्याप्र. फिरते पथक,ढाकणा या पदावर कार्यरत असतांना त्यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन धारणी येथे अपराध क्रमांक ४८३/२०२३ कलम ३८५, ३०४ अ, ५०४ ,३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 च्या नियम 4 (1) (क) अन्वये श्री अश्विन शंकरराव महल्ले, वनपाल यांना उपवनसंरक्षक,मेव्याप्र, गूगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा यांचे दिनांक 03.08.2022 रोजीचे आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे.

2.ज्याअर्थी संदर्भ क्र.3 अन्वये निलंबन आढावा समितीने श्री. अश्विन शंकरराव महल्ले, वनपाल यांच्या निलंबनाचा आढावा घेवून त्यांच्याविरूध्द सुरु असलेल्या न्यायालयीन खटला व विभागीय चौकशीच्या अधीन राहून त्यांना शासन सेवेत पुन:स्थापित करून अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्याची शिफारस केली आहे.

3. त्याअर्थी, आता महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 च्या नियम 4 च्या पोटनियम (5) च्या खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून या आदेशाद्वारे श्री.अश्विन शंकरराव महल्ले, वनपाल यांना त्यांचेविरुध्द प्रलंबित न्यायालयीन खटला व विभागीय चौकशीच्या अधीन राहून अकार्यकारी पदावर शासन सेवेत पुन:स्थापीत करण्यात येत आहे. पुन:स्थापनेनंतर श्री.आश्विन शंकरराव महल्ले वनपाल यांची पदस्थापना **उपवनसंरक्षक, आकोट वन्यजीव विभाग, अकोट अंतर्गत वनपाल वि.से. बोरवा संशोधन शिबिर, सोमठाणा परिक्षेत्र** या रिक्त असलेल्या अकार्यकारी पदावर करण्यात येत आहे.

A.S.Mahalle, Forester Reinstite- 31.01.2024

4. श्री.अश्विन शंकरराव महल्ले, वनपाल यांचेविरूध्द सुरू असलेली न्यायालयीन तसेच विभागीय चौकशीची कार्यवाही त्यांच्या पुन:स्थापनेनंतरही सुरु राहील.

श्री.अश्विन शंकरराव महल्ले, वनपाल यांनी नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजु व्हावे. श्री.अश्विन शंकरराव महल्ले, वनपाल हे नियुक्तीच्या ठिकाणी ज्या दिवशी प्रत्यक्ष रुजु होतील त्या तारखेपासून त्यांचे निलंबन समाप्त होईल.

Jayoti Banerjee

(जयोती बॅनर्जी)
मुख्य वनसंरक्षक
(प्रादेशिक) अमरावती

क्रमांक: कक्ष-८ / आस्था टी-३ / 3257 /२०२३-२४
अमरावती- २, दिनांक 21-2-2024

प्रति,

श्री.आश्विन शंकरराव महल्ले, वनपाल
मार्फत :-उपवनसंरक्षक,मेळघाट व्याघ्र प्रकल्प,गुगामल वन्यजीव विभाग,चिखलदरा

प्रतिलिपी:- विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, अमरावती यांना माहीतीस सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी :-मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांना माहीतीस सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी :-उपवनंसरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प,गुगामल वन्यजीव विभाग,चिखलदरा यांना माहीतीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
प्रतिलिपी :-उपवनंसरक्षक, आकोट वन्यजीव विभाग, आकोट यांना माहीतीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
प्रत :- आदेश फाईल.